Page : १
Date : / /

॥ श्री ॥

# श्री भक्त पुंडलिक.

इंद्राची पत्नी शची ही एकदा वैकुंठात गेली असता श्रीविष्णूचे सौंदर्य पाहून ती मोहित झाली. श्रीविष्णूशी संग करावा अशी तिला इच्छा झाली. श्रीविष्णूने तिचे ते मनोगत ओळखले. श्रीकृष्णावतारात तिला राधा बनवून श्रीविष्णूने तिला आपला संग दिला. श्रीविष्णूच्या संगतील ती व्दारकेत राहत होती. राधा आणि श्रीकृष्ण म्हणजे जीवात्मा आणि परमात्मा. प्रेमाचा अथांग सागर.

व्दारकेत रुक्मिणी सर्वश्रेष्ठ होती. एकदा राधा कृष्णाजवळ बसली होती. इतक्यात रुक्मिणी तिथे आली. राधेने उठून तिला आदर दाखविला नाही. त्यामुळे रुक्मिणी संतापली. ती व्दारकेतून निघाली व दक्षिणेस दिंडीरवनात जाऊन तप करीत राहिली.

रुक्मिणी रागावून निघून गेली हे कळताच श्रीकृष्ण व्दारका सोडून निघाले. संन्याश्याच्या वेषात ते देशोदेशी हिंडू लागले. श्रीकृष्णाला रुक्मिणीशिवाय चैन पडत नव्हते. रुक्मिणी त्यांना कुठेच दिसेना. नंतर ते दक्षिणेस चंद्रभागेच्या तीरावर आले. त्यांनी तिथे रुक्मिणी ध्यानस्थ बसलेली पाहिली. ते दुरूनच रुक्मिणीकडे पाहत राहिले. नंतर त्यांनी तिला हाक मारली व म्हणाले, "पद्मनेत्रे, प्रिये, तू इथे येऊन का बसलीस? मला तुझ्याशिवाय करमत नाही।"

रुक्मिणीने श्रीकृष्णाला ओळखले होते, पण ती म्हणाली "कोण तुम्ही? इथे का आलात? परस्त्रीशी बोलायचे तुम्हाला काय कारण? परनारीला 'प्रिये' म्हणून हाक मारता म्हणजे काय? मला वाटते, बालपणापासूनच तुमचे हे आचरण असावे!" ते ऐकून श्रीकृष्ण हसले. रुक्मिणीसुद्धा हसली. तिचा राग-रूसवा गेला. श्रीकृष्णाने तिचे समाधान केले. मग श्रीकृष्ण व रुक्मिणी त्या ठिकाणीच राहू लागले.

पुंडलिक हा आपल्या मातापित्यांची सेवा करत होता. श्रीकृष्ण प्रसन्न होऊन तिथे गेले. त्याच्या दारात उभे राहिले. वर माग म्हणाले.

पुंडलिकाने एक वीट फेकली व म्हणाला, "मातापित्यांचे पाय चेपून येऊन तुला भेटतो. तोपर्यंत या विटेवर थांबा." तेव्हा श्रीकृष्ण कटीवर हात ठेवून एका विटेवर दोन्ही पाय ठेवून दारात उभे राहिले. मातापित्यांची सेवा करून पुंडलिक बाहेर आला व त्याने श्रीकृष्णाचे पाय धरले.

"पुंडलिका, तू या क्षणी हवे ते माग." श्रीकृष्णाने त्याला सांगितले.

पुंडलिक म्हणाला, "देवा, असा उभा आहेस तसाच इथे चिरकालपर्यंत रहा. जे तुझे भक्त तुझ्या दर्शनाला इथे येतील ते दर्शनाने मुक्त व्हावेत. या जागेचे नाव पंढरपूर पडू दे. ही दक्षिणेकडील व्दारका होऊ दे.

Page : 3
Date : / /

देवा, रुक्मिणीसह तू इथेच राहा. इथून जाऊ नकोस. यापुढे वीटस्थल म्हणून विठ्ठल हे नाव धारण कर. असा मला वर दे. माझ्यावर कृपा कर."

पुंडलिकाने असा वर मागून घेतला. जगाचे कल्याण केले. श्रीकृष्ण रुक्मिणीसह चंद्रभागेच्या तीरी पंढरपुरास विठ्ठल म्हणून राहिला.

दिंडीरवन पावन क्षेत्र पंढरी। परब्रह्म अवतरले उभे विटेवरी ॥
चंद्रभागा तीरी कर कटीवरी। अखंड उभा आहे भक्तांचे व्दारी ॥

पंढरीच्या विठोबाच्या दर्शनास निघालेले वारकरी 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' हाच घोष करतात.

- संकलित
सुनीती विटकर
9552567935